जाता पंढरीसी सुख वाटे जीवा।
आनंदें केशवा भेटतांचि।।
या सुखाची उपमा नाही त्रिभुवनी।
पाहिली शोधूनी अवघी तीर्थे ।।
–संत सेना महाराज

हाचि नेम आतां न फिरें माघारी ।
बैसलें शेजारीं गोविंदाचे ।।१।।
घररिघी जालें पट्टराणी बळें ।
वरिलें सांवळें परब्रम्ह ।।२।।
बळियाचा अंगसंग जाला आतां ।
नाहीं भय चिंता तुका म्हणे
।।३।।




दैनिक
# आकर्षण

संपादक : विजय सांगळे

वर्ष ५ । अंक २६९ । शनिवार २५ जुलै २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २

https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322


# अवघे गरजे पंढरपूर !!

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पत्नी अमृता फडणवीस यांच्या हस्ते विठूरायाची शासकीय महापूजा

### कळंब तालुक्यातील वारकरी बाबासाहेब आणि प्रभावती माने यांना महापूजेचा मान

**पंढरपूर ।** आज आषाढी एकादशीच्या निमित्ताने कोट्यवधी भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या विठूरायाच्या चरणी नतमस्तक होण्यासाठी पंढरीत मोठ्या संख्येने भाविक दाखल झाले आहेत. पंढरीत आज भक्तीसागर उसळल्याच पहायला मिळत आहे. परंपरेप्रमाणे आज पहाटे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सपत्नीक श्री विठ्ठल रुक्मिणी मातेची पूजा केली. आषाढी एकादशीची महापूजा करण्याचा मान धाराशिव जिल्ह्यातील कळंब तालुक्यातील गौरगाव येथील बाबासाहेब महादेव माने आणि त्यांच्या पत्नी सौ प्रभावती बाबासाहेब माने या दांम्पत्याला मिळाला आहे. श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या पूजेनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकारांशी संवाद साधला.

''आपल्या भक्तासाठी विटेवर ऊभ्या असलेल्या पांडुरंगाच्या चरणी नतमस्तक होतो. यावेळी २५ किमी रांग आहे, यासाठी चांगली व्यवस्था करण्यात आली आहे. कोणत्या निमंत्रणाविना भक्त पायी प्रवास करुन येतो. ही माझी पूजा नाही, ही विठ्ठल भक्तांची पूजा केली. येणारा वारकरी हा शेतकरी आहे. तो सर्व प्रकारच्या क्षेत्रातून येणारा वारकरी आहे'' असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. ''या वर्षी ५६ लाख शेतकऱ्यांची कर्जमाफी केली. वीजबिल माफ केली. सर्वांना विनंती आहे पांडुरंगाच दर्शन घ्यायला अनेक लोक येतात. कितीही लोक आले तरी आता योग्य नियोजन केलं जाणार आहे'' असं मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.







## राजस्थानमधून नगरमध्ये मेफेड्रोन विक्रीसाठी आलेला आरोपी अटकेत

### एमआयडीसी पोलिसांच्या कारवाईत साडेअकरा लाखांचा मुद्देमाल जप्त



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** राजस्थानमधून नगर शहरात विक्रीसाठी आणलेले ५ लाख ८३ हजार २०० रुपयांचे २९ ग्रॅम मेफेड्रोन (एमडी) हे घातक ड्रग्स जप्त करण्यात एमआयडीसी पोलिसांना यश आले आहे. या प्रकरणात एका परप्रांतीय आरोपीला अटक करण्यात आली असून, त्याच्याकडून वाहनासह एकूण ११ लाख ४३ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दिनांक २४ जून रोजी रात्री १० च्या सुमारास सहाय्यक पोलीस निरीक्षक हेमंत थोरात हे सहकाऱ्यांसह निंबळक बायपास रोडवर गस्त घालत होते. लामखडे पेट्रोल पंपाजवळ दोन विनानंबरच्या कार संशयास्पदरित्या उभ्या असलेल्या दिसल्या. पोलिसांनी तपासणीसाठी धाव घेतली असता, ब्रिझा कारमधील इसम पळून गेले; मात्र स्विफ्ट कारमधील इसमाला पोलिसांनी जागीच पकडले. चौकशीत त्याने आपले नाव रविप्रकाश भेराराम बिश्नोई (वय २९, मूळ रा. जालोर, राजस्थान; सध्या रा. करमाळा, जि. सोलापूर) असे सांगितले. वाहनाची ■ पान ४ वर

## केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा

### विद्यार्थ्यांच्या आंदोलनापुढे सरकार झुकले

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था –** केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी आपल्या अखेर आज आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. नीट परीक्षेत झालेल्या गोंधळावरून देशभरात सुरू असलेला विवाद आणि जंतर-मंतर येथील विद्यार्थ्यांचे आंदोलन या पार्श्वभूमीवर त्यांनी हा निर्णय घेतला. धर्मेंद्र प्रधान यांनी सोशल मीडियावर याची घोषणा करत राजीनामा देण्यामागील कारणही स्पष्ट केले आहे.

आपल्या राजीनामा पत्रात त्यांनी लिहिले की, गेल्या चार दशकांपेक्षा अधिक काळापासून



ते विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षण सुधारणेसाठी समर्पित राहिलेआहेत. एक मजबूत, सर्वसमावेशक आणि दूरदृष्टी असलेली शिक्षण व्यवस्थाच

कोणत्याही राष्ट्राच्या विकासाचा पाया असते, यावर त्यांचा नेहमीच विश्वास राहिला आहे. मी देशातील तरुणांच्या आकांक्षा, भावना आणि त्यांच्या रास्त ■ पान ४ वर

## रुग्णांच्या आजारांचे वेळेवर निदान होणे अत्यंत महत्त्वाचे – आमदार संग्राम जगताप

### श्री तिलोक आनंद मानव सेवा केंद्रात अत्याधुनिक एक्स–रे व पॅथॉलॉजी लॅब मशिनरीचे लोकार्पण

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** समाजाचे काहीतरी देणे लागते या भावनेतून गेल्या ३६ वर्षांपासून श्री तिलोक आनंद मानव सेवा केंद्र, स्वर्गीय बसंताबाई शिवलालजी गांधी चिकित्सालयाच्या माध्यमातून सर्वसामान्य व गरजू रुग्णांना अल्प दरात आरोग्यसेवा उपलब्ध करून सामाजिक बांधिलकी जपली जात आहे. बदलत्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात वैद्यकीय क्षेत्रात मोठी प्रगती झाली असून रुग्णांना अधिक अचूक व दर्जेदार तपासणी सुविधा मिळाव्यात, या उद्देशाने गांधी परिवाराच्या वतीने अत्याधुनिक एक्स–रे व पॅथॉलॉजी लॅब मशिनरी उपलब्ध करून देण्यात आली आहे. स्वर्गीय शिवलालजी गांधी यांच्या प्रेरणेतून सुरू केलेल्या सेवाभावी कार्याचा वारसा गांधी परिवार अत्यंत समर्पितपणे पुढे नेत असून ही समाजासाठी अभिमानास्पद बाब असल्याचे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले.

ते पुढे म्हणाले की, चांगल्या विचारातूनच समाजाला आधार मिळतो. कोणत्याही आजाराचे योग्य वेळी निदान होऊन त्यावर तातडीने उपचार होणे अत्यंत गरजेचे असते. आर्थिक परिस्थितीमुळे अनेक सर्वसामान्य कुटुंबे आजारांकडे दुर्लक्ष करतात. मात्र अशा रुग्णांना अल्प दरात दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याचे मोलाचे कार्य श्री तिलोक आनंद मानव सेवा केंद्र करत आहे. अत्याधुनिक एक्स–रे व पॅथॉलॉजी लॅब मशिनरीमुळे आजारांचे अचूक निदान होऊन योग्य वेळी उपचार करता येतील व अनेक गंभीर आजार टाळणे शक्य होईल. भगवान महावीरांनी 'मानव सेवा हीच ईश्वर सेवा' असा संदेश दिला असून प्रत्येकाने त्या विचाराचे आचरण करणे आवश्यक आहे.



अहिल्यानगर येथील श्री तिलोक आनंद मानव सेवा केंद्र, स्वर्गीय बसंताबाई शिवलालजी गांधी चिकित्सालय यांच्या वतीने आयोजित अत्याधुनिक एक्स–रे व पॅथॉलॉजी लॅब मशिनरी लोकार्पण सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी आमदार संग्राम जगताप, अण्णासाहेब मुनोत, उद्योजक संतोष बोथरा, सतीश लोढा, सीए अजय गांधी, अॅड. अशोक गांधी, मर्चंट बँकेचे चेअरमन संजय चोपडा, नगरसेविका मीनाताई चोपडा, माजी महापौर भगवान फुलसौंदर, सीए रवींद्र कटारिया, नरेंद्र बाफना, सागर गांधी, शरद मुनोत, पुष्पाताई गांधी, राखी गांधी, चैताली गांधी, संजय गुगळे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी सागर गांधी यांनी प्रास्ताविकात सांगितले की, श्री तिलोक आनंद मानव सेवा केंद्राच्या माध्यमातून गेली ३६ वर्षे गरजू रुग्णांना अल्प दरात आरोग्यसेवा दिली जात आहे. रुग्णांच्या आजारांचे तातडीने व अचूक निदान व्हावे यासाठी एक्स–रे व पॅथॉलॉजी लॅबच्या माध्यमातून तपासण्या केल्या जातात, ज्यामुळे डॉक्टरांना योग्य वेळी उपचार सुरू करणे शक्य होते. या केंद्रातील आरोग्य सेवेचा दररोज सुमारे ५०० रुग्ण लाभ घेतात. केंद्रातील पूर्वीची एक्स–रे व पॅथॉलॉजी लॅब मशिनरी जुनी झाल्याने आता अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित नवीन मशिनरी गांधी परिवाराने उपलब्ध करून दिली आहे. त्यामुळे तपासण्यांमध्ये अधिक अचूकता, वेग आणि विश्वासार्हता ■ पान ४ वर

## नेवाशात शेतात लपवलेल्या गांजासह दोघे रंगेहाथ जेरबंद

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नेवासा तालुक्यातील वाकडी परिसरात मध्यरात्रीच्यासुमारास पोलिसांनी कारवाई करत बेकायदेशीरपणे गांजा बाळगणाऱ्या व विक्रीच्या तयारीत असलेल्या दोन जणांना नेवासा पोलिसांनी रंगेहाथ पकडले असून, त्यांच्याकडून ४ लाख ७८ हजार ६० रुपयांचा तब्बल ४७.८२८ किलो गांजा जप्त करण्यात आला आहे.

वाकडी शिवारात गुंगीकारक अंमली पदार्थांची विक्री होत असल्याची गुप्त माहिती नेवासा पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी प्रताप दराडे यांना दिनांक २४ जुलैच्या रात्री पावणेबाराच्या सुमारास मिळाली मिळाली. त्यानुसारशेवगाव उपविभागीय पोलीस अधिकारी नीरज राजगुरू यांच्या उपस्थितीत नेवासा

पोलिसांनी तात्काळ वाकडी येथील महादेव पंडित



जवदे याच्या राहत्या घराजवळील शेतातील पत्र्याच्या शेडवर छापा टाकला असता तेथे पिवळ्या,पांढऱ्या आणि हिरव्या रंगाच्या ३ वेगवेगळ्या गोण्यांमध्ये

गांजाचा साठा लपवून ठेवल्याचे उघडकीस आले. तेथून ४७ किलो ८२८ ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला. या कारवाईत पोलिसांनी ■ पान ४ वर

## दै. आकर्षण निवडक

### किशोर संस्कृत संवर्धिनी शाळेत चिमुकल्यांची भक्तीमय दिंडी



**अहिल्यानगर - अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या किशोर संस्कृत संवर्धिनी शाळेत भक्ती, संस्कार आणि वारकरी परंपरेचा अनोखा संगम अनुभवायला मिळाला. आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर शाळेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या बाल वारकरी दिंडीमध्ये चिमुकल्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत संपूर्ण परिसर विठ्ठलनामाच्या गजराने दुमदुमून सोडला. टाळ-मृदुंगाचा निनाद, भगव्या पताकांची दिमाखदार उंचावलेली पताका आणि ''जय हरी विठ्ठल'', ''ज्ञानोबा-तुकाराम'', ''पुंडलिक वरदा हरी विठ्ठल'' या अखंड नामघोषामुळे परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले. दिंडीत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी विठ्ठल-रुक्मिणी, संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज तसेच विविध संत-महात्मे आणि वारकरी यांची आकर्षक व पारंपरिक वेशभूषा परिधान केली होती. या वेषभूषेमुळे वारकरी संप्रदायाची परंपरा आणि संत साहित्याची समृद्ध परंपरा जिवंत झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. हातात टाळ, डोक्यावर तुळशीची माळ, भगवे ध्वज आणि मुखी विठ्ठलनाम असा वारकरी वेश परिधान करून चिमुकल्यांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. दिंडीदरम्यान विद्यार्थ्यांनी अभंग, भजन आणि नामस्मरण करत भक्तीचा उत्साह अनुभवला. ''जय जय राम कृष्ण हरी'', ''ज्ञानोबा-तुकाराम'' तसेच ''पुंडलिक वरदा हरी विठ्ठल'' या नामघोषांनी संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. टाळ-मृदुंगाच्या तालावर विद्यार्थ्यांनी केलेले सादरीकरण उपस्थितांच्या मनाचा ठाव घेणारे ठरले.आषाढी एकादशीच्या निमित्ताने शाळेत भक्तीमय सांस्कृतिक कार्यक्रमाचेही आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी विठ्ठलभक्तीवरील गीतांचे सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. याशिवाय शाळेच्या मैदानावर पारंपरिक वारकरी पद्धतीने रिंगण सोहळा सादर करण्यात आला. चिमुकल्यांनी उत्स्फूर्तपणे सादर केलेल्या या रिंगण सोहळ्याला उपस्थितांकडून भरभरून दाद मिळाली.मुलींनी पारंपरिक वेशभूषेत फुगड्यांचा फेर धरत महाराष्ट्राच्या लोकसांस्कृतिक परंपरेचे सुंदर दर्शन घडविले. टाळ-मृदुंगाच्या लयबद्ध तालावर आणि विठ्ठलनामाच्या गजरात विद्यार्थ्यांचा उत्साह पाहण्यासारखा होता.**

## श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय श्रीगोंदा येथे दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांची जयंती विविध उपक्रमाने साजरी



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**बेलवंडी–** श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, श्रीगोंदा येथे राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री व लोकनेते अजितदादा पवार यांची जयंती विविध उपक्रमांनी साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाला सहकारमहर्षी शिवाजीराव नागवडे सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन राजेंद्रदादा नागवडे यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती.

कार्यक्रमात उपस्थितांना संबोधित करताना राजेंद्रदादा नागवडे अत्यंत भावूक झाले. मनोगत व्यक्त करताना ते म्हणाले ''नागवडे कुटुंब आणि पवार कुटुंब यांचे पिढ्यानपिढ्यांचे अत्यंत जिव्हाळ्याचे व दृढ असे ऋणानुबंध राहिलेले आहेत. अजितदादा हे केवळ एक राजकीय नेते नव्हते, तर प्रशासनावर प्रचंड पकड असलेला आणि शेतकऱ्यांच्या सुख-दुःखाशी थेट जोडलेला एक खरा लोकनेता होता.

दादांचे निर्णय कौशल्य, कामाचा प्रचंड वेग आणि कार्यकर्त्यांवर असलेले प्रेम अद्वितिय होते. कोणत्याही संकटाच्या काळात शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे ही त्यांची खरी ओळख होती. दादांनी नेहमीच सहकार क्षेत्राला आणि ग्रामीण विकासाला प्रथम प्राधान्य दिले. शब्द पाळणारा नेता म्हणून त्यांची ख्याती संपूर्ण महाराष्ट्रात होती.

पहाटेपासून कामाला सुरुवात करून शेवटच्या घटकापर्यंत न्याय देण्याची त्यांची कार्यशैली आपण सर्वांनी जवळून पाहिली आहे. त्यांच्या जाण्याने सहकार आणि राजकीय क्षेत्राची कधीही भरून न निघणारी हानी झाली आहे. आज दादा आपल्यात नाहीत, या सत्यावर अजूनही मनाचा विश्वास बसत नाही; असे वाटते की दादा कुठेतरी दौऱ्यावर गेले आहेत आणि लगेच परत येतील. त्यांच्या आठवणी आणि त्यांनी दाखवलेला विकासाचा मार्ग आपल्याला कायम प्रेरणा देत राहील. दादांचे विचार पुढे नेणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतिषचंद्र सूर्यवंशी यांनी केले. प्रास्ताविक करताना त्यांनी अजितदादांच्या पर्यावरणप्रेमाचा विशेष उल्लेख केला. ते म्हणाले ''अजितदादांचे निसर्गावर आणि पर्यावरणावर उदंड प्रेम होते. कोणत्याही विकासकामात पर्यावरणाचा समतोल राखला पाहिजे, असा त्यांचा नेहमीच आग्रह असायचा. म्हणूनच दादांना खऱ्या अर्थाने अभिवादन करण्यासाठी आपल्या संस्थेचे अध्यक्ष राजेंद्रदादा नागवडे यांच्या संकल्पनेतून आज एक विशेष उपक्रम राबवला जात आहे. या उपक्रमांतर्गत महाविद्यालयातील प्रत्येक कर्मचाऱ्याने आज एक झाड लावून त्याचे दत्तक विधान करायचे आहे. केवळ झाड लावणे हे आपले ध्येय नसून, त्याचे संपूर्ण संगोपन आणि संवर्धन करण्याची जबाबदारी प्रत्येक कर्मचाऱ्याची असेल. निसर्गाचे रक्षण करणे हीच दादांच्या विचारांची खरी अंमलबजावणी ठरेल. वृक्षारोपण हा केवळ एक कार्यक्रम नसून तो एक हरित संकल्प आहे. वाढत्या प्रदूषणाच्या काळात अशा हरित उपक्रमांची नितांत गरज आहे. दादांच्या स्मृती या वृक्षांच्या रूपाने महाविद्यालयाच्या प्रांगणात कायम बहरत राहतील. या झाडांची जोपासना करून आपण परिसर हिरवागार आणि सुंदर बनवूया. सर्व कर्मचाऱ्यांनी या पर्यावरण संवर्धनाच्या कार्यात सक्रिय सहभाग नोंदवावा, हेच दादांना दिलेले सर्वोत्तम अभिवादन ठरेल.''

या प्रसंगी सहकारमहर्षी नागवडे कारखान्याचे उपाध्यक्ष संदीप औटी, संचालक श्रीनिवास घाडगे, विश्वनाथ गिरमकर, विठ्ठल जंगले बंडोपंत जगताप, भाऊसाहेब नेटके, प्रा. सुरेश रसाळ, कारखान्याचे कार्यकारी संचालक प्रवीण शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य चंद्रभान कातोरे, वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व विभाग प्रमुख, पर्यवेक्षक प्रवीण टकले, सर्व शिक्षक-शिक्षकेतर सेवक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त इंदिरा गांधी पॉलिटेक्निकमध्ये वृक्षारोपण व प्रतिमापूजन



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**बेलवंडी–** स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेच्या इंदिरा गांधी पॉलिटेक्निक, बेलवंडी (शु.) येथे वृक्षारोपण व प्रतिमापूजनाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. विद्यार्थी, पालक, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा हा उपक्रम आयोजित करण्यात आला.

हा कार्यक्रम श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. श्री राजेंद्रदादा नागवडे, सहकार महर्षी शिवाजीराव नारायणराव नागवडे सहकारी साखर कारखाना लिमिटेड, श्रीगोंदा फॅक्टरी यांच्या चेअरमन मा. श्री राजेंद्रदादा नागवडे, अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेच्या संचालिका सौ. अनुराधाताई नागवडे, नागवडे सहकारी साखर कारखान्याच्या व्हाईस चेअरमन सौ. मेघाताई संदीप औटी तसेच श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेचे निरीक्षक श्री सचिनराव लगड यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला. यावेळी विद्यार्थी व पालकांच्या हस्ते विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. वृक्षारोपणाच्या माध्यमातून स्व. अजितदादा पवार यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन करण्यात आले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत भोईटे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना पर्यावरण संरक्षण ही प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी असल्याचे सांगितले. वाढते प्रदूषण, हवामानातील बदल आणि नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन लक्षात घेता प्रत्येकाने किमान एक तरी वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प करावा, असे आवाहन त्यांनी केले. या उपक्रमात सहभागी सर्वांनी पर्यावरण संवर्धनाची शपथ घेतली. महाविद्यालय परिसर अधिक हरित, स्वच्छ व पर्यावरणपूरक करण्यासाठी अशा सामाजिक उपक्रमांचे नियमित आयोजन करण्यात येत असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

कार्यक्रमास प्राचार्य डॉ. प्रशांत भोईटे, विभागप्रमुख हवालदार सर, नातू सर, इथापे सर, शिंदे सर, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी तसेच पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी लावलेल्या वृक्षांचे नियमित संगोपन करण्याचा संकल्प व्यक्त केला. सर्वांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे हा उपक्रम प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला. वृक्षारोपणासारख्या पर्यावरणपूरक उपक्रमांमुळे समाजात पर्यावरण संरक्षणाबाबत जनजागृती होण्यास निश्चितच हातभार लागेल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

## आषाढी एकादशीनिमित्त नय्यर विद्यालयात आकर्षक रिंगण सोहळा उत्साहात



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** येथील बायजाबाई शिक्षण प्रसारक मंडळाचे दुर्गादेवी अमर चंद नय्यर विद्या मंदिर व श्रीमान बिशंबरदास अमरचंद नय्यर माध्यमिक विद्यालयाच्या वतीने आषाढी एकादशीनिमित्त दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या दिंडीत बालगोपाळ आकर्षक वारकरी वेशभुषा परिधान करून सहभागी झाले होते. दिंडीचे ठिकठिकाणी नागरिकांनी उत्साहात स्वागत केले. विठू नामाचा गजर करीत विद्यार्थ्यांनी परिसर दणाणून सोडला. विद्यार्थी भगव्या पताका घेऊन दिंडीत सहभागी झाले होते.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष काकाशेठ नय्यर, उपाध्यक्ष बापूराव आंधळे, सचिव बाळासाहेब पवार, खजिनदार भास्करराव गोरे, संचालिका जनाबाई पवार, नगरसेविका संध्याताई पवार, मुख्याध्यापक एकनाथ मोटे, माध्यमिकचे मुख्याध्यापक श्रीकृष्ण पवार, माजी विद्यार्थी प्रदीप तागड उपस्थित होते.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष काकाशेठ नय्यर व सचिव बाळासाहेब पवार यांच्या हस्ते पालखी पूजन झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी वारकरी वेशात आकर्षक असा रिंगण सोहळा सादर केला. रिंगण सोहळ्यानंतर शाळेतून दिंडीने प्रस्थान केले. पालखी नय्यर विद्यालय, नामदेव चौक, श्रीराम चौक, पाईपलाईन रोड मार्गे बायजाबाई सोसायटीतील श्री विठ्ठल- रुक्मिणी मंदिरात गेली. दिंडीचे स्वागत नगरसेविका संध्याताई पवार व जनाबाई पवार यांनी केले.

## जिल्हास्तरीय नशामुक्त भारत स्पर्धांचे २९ जुलै रोजी आयोजन

### राज्य व राष्ट्रीय स्तरावर प्रतिनिधित्वाची संधी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** भारत सरकारच्या युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालयाच्या मेरा युवा भारत ( ), अहिल्यानगर आणि सेंटर फॉर स्टडीज इन रुरल डेव्हलपमेंट (सीएसआरडी) यांच्या संयुक्त विद्यमाने युवा शक्ती-नशामुक्त भारताची शक्ती या संकल्पनेवर आधारित जिल्हास्तरीय विविध स्पर्धांचे आयोजन दि. २९ जुलै २०२६ रोजी सीएसआरडी, अहिल्यानगर येथे करण्यात येणार आहे.

युवकांमध्ये व्यसनमुक्तीबाबत जनजागृती करणे, त्यांच्या सर्जनशीलतेला वाव देणे आणि सामाजिक उत्तरदायित्वाची भावना अधिक दृढ करणे, या उद्देशाने जिल्ह्यातील १५ ते २९ वर्षे वयोगटातील युवक-युवतींना या स्पर्धांमध्ये वैयक्तिक किंवा सांघिक स्वरूपात सहभागी होता येणार आहे.

स्पर्धांमध्ये लोकगीत (गायन), नृत्य, नुक्कड नाटक, माईम, चित्रकला, वादविवाद, लघुपट/रील, घोषवाक्य लेखन तसेच कविता (स्लॅम पोएट्रीसह) या विविध कला व साहित्य प्रकारांचा समावेश करण्यात आला असून, सर्व स्पर्धांचा विषय नशामुक्त भारत हा आहे. युवकांनी आपल्या कलाकृतीतून व्यसनमुक्तीचा प्रभावी व सकारात्मक संदेश समाजापर्यंत पोहोचवावा, असे आवाहन करण्यात आले आहे. स्पर्धेतील विजेत्यांना अहिल्यानगर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करण्याची संधी राज्य व राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये मिळणार आहे. त्यामुळे जिल्ह्यातील युवक-युवतींनी या संधीचा लाभ घेऊन आपल्या कलागुणांचे प्रभावी सादरीकरण करावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. इच्छुक स्पर्धकांनी मेरा युवा भारत ( ) पोर्टलवर नोंदणी करून इच्छित स्पर्धेची निवड करावी आणि मार्गदर्शक सूचनांनुसार ऑनलाईन अर्ज सादर करावा.

## आषाढी वारीत वारकऱ्यांचे स्व. अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त वृक्षारोपण

### वारकरी परंपरेतून हरित संस्कार । वृक्ष लागवड व संवर्धन हीच खरी समाजसेवा व विठ्ठलभक्ती - पवार



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पंढरपूरला आषाढी वारीसाठी अहिल्यानगर शहरातून गेलेल्या वारकऱ्यांनी राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या स्मरणार्थ वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. लायन्स क्लब व निसर्ग व सामाजिक प्रदूषण निवारण मंडळाच्या जिल्हाध्यक्षा लतिकाताई पवार यांच्या पुढाकारातून हा उपक्रम राबविण्यात आला. सोलापूर जिल्ह्यातील परिते येथील डीसीसी बँक शाखेच्या परिसरात विविध प्रजातींच्या वृक्षांची लागवड करण्यात आली.

या उपक्रमात डीसीसी बँकेचे शाखाधिकारी एच. बी. लामकाते, कुर्मदास साखर कारखान्याचे संचालक राहुल पाटील, परिते विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे माजी चेअरमन हनुमंत बापू लांडे, विशाल मिस्किन, जे. के. काळे, बँकेचे कर्मचारी तसेच आषाढी वारीतील वारकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले. दिंडीतील छायाताई राजपूत, सुषमा दंडवते, पुष्पा वाकळे, संगीता देव्हारे, अनुसया दंडवते, सुनीता कानडे, गंगुबाई वाघ, सपना लाटे, केशर गांगर्डे, मंगल चव्हाण आणि शारदा दळवी यांच्यासह अनेक वारकऱ्यांनी वृक्षारोपणात सहभाग घेत पर्यावरण रक्षणाचा संकल्प केला.

उपस्थितांनी वृक्ष लागवड करून स्व. अजित पवार यांना अभिवादनच केले. तर ''एक वृक्ष म्हणजे अनेक पिढ्यांसाठी जीवनाचा श्वास'' हा संदेशही समाजापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला. वारीच्या पवित्र वातावरणात पार पडलेल्या या उपक्रमामुळे अध्यात्म आणि पर्यावरण संरक्षणाचा सुंदर संगम अनुभवायला मिळाला.

लतिकाताई पवार म्हणाल्या की, वारी ही विठ्ठल भक्तीची परंपरा असून, त्याला वृक्षारोपण व पर्यावरण संवर्धनाची जोड देण्यात आली आहे. आज पर्यावरणाचे संरक्षण ही काळाची गरज बनली आहे. त्यामुळे स्व. अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त पुष्पहार अर्पण करण्यापेक्षा वृक्षारोपण करून त्यांना अभिवादन करण्याचा निर्णय घेतला. प्रत्येक नागरिकाने आपल्या आयुष्यात किमान एक तरी वृक्ष लावून त्याचे संगोपन केले, तर भविष्यातील पिढ्यांना निरोगी आणि हरित पर्यावरण मिळू शकते. वृक्ष लागवड ही एक दिवसाची कृती नसून त्याचे संगोपन हीच खरी समाजसेवा व विठ्ठलभक्ती असल्याचे त्यांनी सांगितले.

### शब्दकोडे क्रमांक : १४



**आडवे शब्द :** १. विज्ञानाचे प्रयोग करण्याची जागा४. उतावळा ६. जुन्या कपड्यांना करतात ती डागडुजी ८. चिलट ९. गणपतीस प्रिय असलेले खाद्य १०. कलंक १२. लीन १४. आकाश १६. बशीचा जोडीदार १८. कणखर मनाचा २१. रक्ताचा रंग २१. इंग्रजीत-बदक २२. एक हिंदी सिनेमा '.. ने बना दी जोडी' २३. रुची २४. अग्र २६. आमटीवरील तेलाचा थर २७. कुकर्म २८. शर्त २९. सरकारी अखत्यारीत असलेले शिक्कापत्र ३०. आश्चर्य ३२. हिंदीत-सरोवर ३५. गुळापूर्वीची उसाची अवस्था ३७. गोंगाट ४०. पास-उलट लिहा ४१. फोडणीसाठी वापरतात ४२. अंतर ४४. मानवाचा दिलेला बळी ४५. भिंतीस पडलेली भेग ४७. पराभव ४९. नवी कोरी ५२. सूर्य ५५. आब ५६. इंग्रजीत-चावी ५७. भित्रा

**उभे शब्द :** १. विविध जातीचा नमुना २. तांब्या ३. सरकार ४. पावसाळ्यात आढळणारा एक जीव ५. मोठा-हिंदीत ७. पैसे न देता ११. फणसाच्या आतील मगज १३. एक पाण्याचा स्त्रोत १५. ठळक १७. पुन्हा १९. एक फळ २३. स्वभाव २४. डाळ शिजवण्यासाठी वापरतात २५. पारंपारिक बसण्याचे साधन २६. दनत-उलट लिहा २७. पालन करणारे २८. अबोला ३१. वकीली ३३. नूतन ३४. पहाटे गायलेले देवाचे स्तवन ३६. एक माप ३८. धर्म-पंथ ३९. पशू ४०. बळासह ४३. कलफा-उलट लिहा ४६. पत्र ४८. मजल ५०. दैना ५२. रांग ५३. घराचे बांधकाम करण्यासाठी वापरतात ५४. झुला

### शब्दकोडे क्रमांक : १३ चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| म | रा | ठी | | बे | री | ज | | सा | ज | रे | |
| त | म | | धी | ट | | ल | व | | ग | | घ |
| दा | | मा | मी | | वि | | डा | ल | | वा | डी |
| न | र | म | | आ | रो | ह | | पं | ग | त | |
| | म | ला | व | रो | ध | | थो | डा | | ड | गा |
| मा | मा | | जी | प | | प्रा | | व | य | | व |
| क | ण | ख | र | | सा | र्थ | क | | मु | ळा | |
| ड | | ड | | का | म | ना | | ना | ना | | सा |
| | चा | क | री | | ना | | दा | म | | तो | फ |
| च | क | वा | | वा | | ना | द | | फ | ळा | |
| ल | | स | त | यु | ग | | ला | व | णी | | नी |
| | क | ला | म | | हू | ल | | जा | | रा | व |

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### सोनम वांगचूक यांच्या अटकेच्या निषेधार्थ पैठणमध्ये लाक्षणिक उपोषण



पैठण- लडाखचे पर्यावरणवादी व सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचूक यांना करण्यात आलेल्या कथित बेकायदेशीर अटकेच्या निषेधार्थ पैठण शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर सामाजिक कार्यकर्त्यांनी शुक्रवारी एक दिवसीय लाक्षणिक उपोषण सुरू केले. या आंदोलनाद्वारे सोनम वांगचूक यांची तात्काळ सुटका करावी, लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा अधिकार अबाधित ठेवावा तसेच लोकशाही मूल्यांचे संरक्षण करावे, अशी मागणी आंदोलकांनी केली. आंदोलनस्थळी संविधानाच्या प्रस्तावनेचे वाचन करून केंद्र सरकारच्या भूमिकेचा निषेधही व्यक्त करण्यात आला. यावेळी विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, युवक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आंदोलकांनी शांततामय मार्गाने आंदोलन करत प्रशासनामार्फत आपल्या मागण्यांचे निवेदन शासनाकडे पाठविण्याची मागणी केली.

### रविवारी एक हसीना थी गीतांची मैफलीचे आयोजन



अहिल्यानगर- शहरातील संगीतप्रेमी आणि रसिक प्रेक्षकांसाठी सुरांची एक अनोखी आणि भव्य मेजवानी ॲड.अमीन धारानी प्रस्तुत एक हसीना थी या हिंदी चित्रपटांमधील सुपरहिट आणि सदाबहार गाण्यांचा बहारदार कार्यक्रम रविवार दिनांक २६ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ठीक ६-३० वाजता माऊली सभागृह अहिल्यानगर येथे संपन्न होणार आहे.असल्याचे आयोजक अमीन धाराणी यांनी सांगितले. जुन्या-नव्या आठवणींना उजाळा देणाऱ्या या सुरेल प्रवासात सुप्रसिद्ध गायक ॲड.अमीन धारानी, सुप्रसिद्ध गायक हेमंत नरसाळे,चंदर ललवाणी, लोकप्रिय गायिका सौ.पल्लवी खरात, ॲड.गुलशन धारानी, वंदना जंगम,अनाम प्रेम संस्थेच्या सुप्रसिद्ध गायिका गौरी इंगळे आणि सुप्रसिद्ध गायक अजित माने हे सर्व कलाकार मिळून हिंदी चित्रपटसृष्टीतील अजरामर गीतांचा नजराणा सादर करणार आहेत. कार्यक्रमास डीसीबी बँकेचे सहकार्य लाभले असून प्रवेश सर्वांना विनामूल्य आहे .अधिक माहितीसाठी ७०४०११९९८८ या नंबरवर संपर्क साधावा.असे आवाहन राजकुमार गुरनानी यांनी केले आहे. तरी सर्व संगीतप्रेमी नगरकरांना या सुश्राव्य गाण्यांचा आणि सुरेल प्रवासाचा आनंद घेण्यासाठी आपल्या सहकुटुंब, सहपरिवार आणि मित्रपरिवारासह उपस्थित राहण्याचे आवाहन आबीद खान यांनी केले आहे.

### श्री श्रमिक बालाजी देवस्थानात २२ ऑगस्ट रोजी सर्व हिंदू समाजासाठी सामुदायिक विवाह सोहळा

अहिल्यानगर - श्री श्रमिक बालाजी सामाजिक संस्था (ट्रस्ट), श्रमिकनगर, सावेडी यांच्या वतीने देवस्थानाच्या ३३ व्या वार्षिक महोत्सवानिमित्त शनिवार, दि. २२ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी १.१८ वाजता श्री व्यंकटेश कल्याणमंडप येथे हिंदू धर्मातील सर्व जातींसाठी सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांना विवाहाचा खर्च कमी व्हावा, तसेच साधेपणाने आणि सामाजिक ऐक्य जपत विवाह पार पडावेत या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. इच्छुक वधू-वरांनी दि. १५ ऑगस्ट २०२६ पर्यंत श्री श्रमिक बालाजी मंदिरात सायंकाळी ६.३० ते ९.०० या वेळेत नावनोंदणी करावी, असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.विवाहासाठी अर्ज करताना आवश्यक कागदपत्रे सादर करणे बंधनकारक असून वधूचे किमान वय १८ वर्षे व वराचे किमान वय २१ वर्षे पूर्ण असणे आवश्यक आहे. आंतरजातीय विवाह असल्यास पालकांचे संमतीपत्र जोडणे आवश्यक आहे.अधिक माहितीसाठी व नावनोंदणीसाठी संपर्क :श्री. विनोद म्याना (अध्यक्ष) ९८५०६७७७७४ श्री. नारायण यन्नम (विश्वस्त) ९४२०६०२०९०.

# संतांची शिकवण, सेवा आणि समाजहिताचा वारसा जपणे हीच खरी आषाढी एकादशी- महापौर गाडे

**आषाढी एकादशीनिमित्त शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणेश मंदिर माळीवाडा येथील श्री संत सावता महाराज व विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात भक्तिभावाचे वातावरण; महापौर ज्योतीताई गाडे व आयुक्त यशवंत डांगे यांच्या हस्ते महापूजा**



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर-** आषाढी एकादशीच्या निमित्त शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणेश मंदिर माळीवाडा येथील श्री संत सावता महाराज व विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात अत्यंत भक्तिमय वातावरणात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. पहाटेपासूनच विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी भाविकांनी मोठ्या संख्येने मंदिरात गर्दी केली होती. ''विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल'', ''ज्ञानोबा-तुकाराम'' अशा अखंड नामगजराने संपूर्ण मंदिर परिसर दुमदुमून गेला होता. मंदिर परिसर आकर्षक फुलांच्या सजावटीने सुशोभित करण्यात आला होता. फुलांच्या कमानी, रंगीबेरंगी रांगोळ्या आणि दीपसजावटीमुळे मंदिर परिसराला उत्सवी स्वरूप प्राप्त झाले होते. दिवसभर विविध धार्मिक विधी, अभिषेक, आरती आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी महापौर ज्योतीताई गाडे तसेच महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांच्या शुभहस्ते श्री विठ्ठल-रुक्मिणीची विधिवत महापूजा करण्यात आली. मंत्रोच्चार आणि वैदिक विधींमध्ये संपन्न झालेल्या या महापूजेला उपस्थित भाविकांनी मोठ्या श्रद्धेने सहभाग घेतला. यावेळी देवस्थानचे अध्यक्ष ॲड अभय आगरकर, उपाध्यक्ष पंडितराव खरपुडे, सचिव अशोकराव कानडे, खजिनदार पांडुरंग नन्नवरे, विश्वस्त रंगनाथ फुलसौंदर , चंद्रकांत फुलारी, विजय कोथिंबीरे , नितीन पुंड यांच्यासह अनेक मान्यवर, महिला भगिनी आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महापूजेनंतर देवस्थानच्या वतीने महापौर ज्योतीताई गाडे आणि आयुक्त यशवंत डांगे यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी मंदिर परिसरातील फुलांची सजावट, स्वच्छता व्यवस्था आणि भाविकांसाठी करण्यात आलेल्या सुविधांचे कौतुक केले. महाप्रसादाचे अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने वाटप करण्यात आले असून हजारो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. संपूर्ण कार्यक्रमात भक्तिभावाबरोबरच सामाजिक ऐक्य आणि सेवाभावाचे दर्शन घडत होते.

महापौर ज्योतीताई गाडे आपल्या भाषणात म्हणाल्या, ''आषाढी एकादशी हा केवळ धार्मिक उत्सव नसून तो समाजाला एकत्र आणणारा, सेवा, समता आणि मानवतेचा संदेश देणारा दिवस आहे. संत सावता माळी, संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर आणि इतर संतांनी दिलेला विचार आजही समाजाला योग्य दिशा देणारा आहे. त्यांच्या शिकवणीमधून परिश्रम, प्रामाणिकपणा, स्वच्छता आणि समाजसेवेची प्रेरणा मिळते. या परंपरा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी आपली सर्वांची आहे.''

त्या पुढे म्हणाल्या, ''मंदिर हे केवळ पूजेचे स्थान नसून समाजातील एकात्मता आणि संस्कारांचे केंद्र आहे. अशा धार्मिक आणि सांस्कृतिक उपक्रमांमुळे समाजामध्ये बंधुभाव वाढतो. महानगरपालिकेच्या माध्यमातून शहराच्या विकासाबरोबरच धार्मिक आणि सांस्कृतिक वारशाचे जतन करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जातील. नागरिकांनी स्वच्छता, पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक बांधिलकी जपत संतांच्या विचारांचा स्वीकार करावा, हीच खरी विठ्ठल भक्ती ठरेल.''

महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांनी आपल्या मनोगतात सांगितले, ''शहराच्या सांस्कृतिक परंपरा जपणाऱ्या अशा मंदिरांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. देवस्थान समितीने आषाढी एकादशीनिमित्त केलेले नियोजन, स्वच्छता, भाविकांसाठी केलेली व्यवस्था आणि फुलांची सजावट निश्चितच कौतुकास्पद आहे.

# के.जी.महाविद्यालयात लोकमान्य टिळक जयंती उत्साहात संपन्न

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर-** के. जी. कॉलेज आर्ट अँड कॉमर्स महाविद्यालयात २३ जुलै रोजी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. संचालिका डॉ स्वाती मुनोत यांनी लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेचे पूजन करून टिळकांनी स्वातंत्र्यालाढ्यात दिलेल्या योगदानाचा तसेच शिक्षण,राष्ट्रप्रेम आणि समाजजागूकृतीसाठी केलेल्या कार्याची माहिती दिली.

श्री सिद्धांत मुनोत यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमा चे आभार डॉ. वर्षा कीर्तने, यांनी मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. रोहिणी क्षीरसागर यांनी केले यावेळी प्रा. स्नेहल बोरावके, प्रा. योगेश चकावते, सौ.हर्षाली रासकर आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# ग्रामसभेत संतापाचा स्फोट! गैरव्यवहाराच्या आरोपांवरून आडूळमध्ये गोंधळ

**रस्ते, पाणी व विकासकामांवर ग्रामस्थांचा जाब; चौकशी न झाल्यास बेमुदत उपोषणाचा इशारा**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पैठण-** पैठण तालुक्यातील आडूळ येथील ग्रामपंचायतीच्या निधी खर्चातील कथित गैरव्यवहाराच्या आरोपांवरून गुरुवारी झालेल्या ग्रामसभेत वातावरण चांगलेच तापले. विकासकामांतील अनियमिततेची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी करत ग्रामस्थांनी सरपंच, ग्रामविकास अधिकारी व सदस्यांना धारेवर धरले. यावेळी ग्रामसभेत काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले.

गावातील रस्त्यांची दुरवस्था, पाणीटंचाई, स्वच्छतेचा अभाव आणि विकासकामांतील कथित अनियमितता या मुद्द्यांवर ग्रामस्थांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. ग्रामसभेनंतर ग्रामस्थांनी संबंधित अधिकाऱ्यांना गावातील खराब रस्त्यांवरून पायी फिरवून प्रत्यक्ष परिस्थिती दाखविली. त्यामुळे परिसरात मोठी चर्चा रंगली.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, ग्रामपंचायतीतील निधी खर्चाबाबत पंचायत समिती व जिल्हा परिषदेकडे यापूर्वीही तक्रारी करण्यात आल्या आहेत. मात्र, अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याने आता बेमुदत उपोषणाचा इशारा देण्यात आला आहे. याबाबत ग्रामस्थ सचिन चव्हाण यांनी, ''ग्रामपंचायत निधीतील कथित गैरव्यवहाराबाबत अनेकदा तक्रारी करूनही कारवाई झालेली नाही. त्यामुळे आता बेमुदत उपोषणाशिवाय पर्याय नाही,'' असे सांगितले.

दरम्यान, ग्रामविकास अधिकारी नारायण पखुळे यांनी गैरव्यवहाराचे आरोप फेटाळून लावत, ''ग्रामपंचायतीत कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार झालेला नाही. गावात स्वच्छतेसाठी घंटागाडी नियमित सुरू असून रस्त्यांच्या प्रश्नांवरही उपाययोजना सुरू आहेत,'' असे स्पष्ट केले.

# मनाची स्थिरता म्हणजेच समाधानाची स्थिती होय - अनिकेत घोटणकर

**सावेडी ज्येष्ठ नागरिक मंचच्या वतीने चित्ती असू द्यावे समाधान विषयावर व्याख्यान**



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर-** शरीर व मन यांचा संबंध खूप जवळचा आहे. म्हणून सकारात्मक विचाराने मनावरचा ताण योग केल्याने कमी होतो. चित्तामध्ये समाधान नसल्याने शरीरात अनेक रोग, व्याधी निर्माण होतात. योगस् चित्त वृत्ती निरोध:असे म्हटले जाते. पतंजली योग सांगते, अथ: योगा अनुशासनम् मन हे अत्यंत चंचल आहे. ते नेहमीच संकल्प विकल्प करीत असते. म्हणूनच मनाची स्थिरता म्हणजेच समाधानाची स्थिती होय. असे प्रतिपादन वैद्य.अनिकेत घोटणकर यांनी केले.

सावेडी ज्येष्ठ नागरिक मंचच्या वतीने चित्ती असू द्यावे समाधान या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी अध्यक्ष शरद कुलकर्णी, एस आर जोशी, ज्योती केसकर, पुष्पा चितांबर, बलभीम पांडव, शुभदा जहागीरदार, आदिनाथ जोशी, स्नेहल वेलणकर, चारुशीला करवंदे, दिलीप जोशी, सतीश सातभाई श्रीकांत नाईक, डॉ. पोतणीस, सर्वोत्तम क्षीरसागर, संतोष गोरे उपस्थित होते.

ते पुढे म्हणाले, जीव जन्माला आल्यापासून सत्व, रज, तम या त्रिगुणाचे प्राबल्य प्रत्येकाच्या शरीरात कमी जास्त प्रमाणात व त्या त्या परिस्थितीनुसार होत असते. पूर्वकर्मानुसार प्रत्येकाला जन्म मिळत असतो. आणि जे संचित कर्म असते त्याप्रमाणे प्रत्येकाला सुख दुःख भोगावे लागते. म्हणून प्रत्येकाने कर्म चांगले करावे. जगद्गुरु तुकाराम महाराज म्हणतात चित्ती असू द्यावे समाधान.

यावेळी, मंचच्या वतीने सभासदांचे वाढदिवस साजरे करण्यात आले. आदिनाथ जोशी यांनी ७५ वर्ष पूर्ण व पुष्पा चितांबर यांचा विशेष सत्कार करण्यात आला. बऱ्याच सभासदांनी मंचास देणगी रूपाने शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्र संचालन बाजीराव जाधव यांनी केले तर पुष्पा कोरे यांनी आभार मानले.

# प्रभाग क्रमांक १० मध्ये घाणीचे साम्राज्य; नाल्याचे पाणी रस्त्यावर, नागरिकांचे हाल

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**पैठण-** पैठण नगर परिषदेच्या प्रभाग क्रमांक १० मध्ये घाणीचे साम्राज्य पसरले असून नाल्याचे सांडपाणी थेट रस्त्यावर तुंबले आहे. रस्त्यावर साचलेले पाणी, कचऱ्याचे ढिग आणि दुर्गंधीमुळे परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, अनेक दिवसांपासून ही समस्या कायम असून वारंवार तक्रारी करूनही नगर परिषद प्रशासन आणि संबंधित नगरसेवकांकडून कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नाही. पावसामुळे परिस्थिती आणखी गंभीर झाली असून रस्त्यावरून पायी चालणे आणि वाहन चालविणेही धोकादायक बनले आहे. साचलेल्या पाण्यामुळे डासांची उत्पत्ती वाढून साथीच्या आजारांचा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे नगर परिषद प्रशासनाने तातडीने नाल्याची साफसफाई करून सांडपाण्याचा निचरा करावा, कचरा हटवावा आणि प्रभाग क्रमांक १० मधील नागरिकांना या समस्येतून त्वरित दिलासा द्यावा, अशी मागणी स्थानिक रहिवाशांनी केली आहे.

# श्री ढोकेश्वर महाविद्यालयात वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पारनेर-** श्री ढोकेश्वर महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना (एन.एस.एस.) विभाग व वनस्पतीशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. वृक्षारोपण कार्यक्रम प्रसंगी अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे ज्येष्ठ विश्वस्त मा. श्री. सीताराम खिलारी यांनी वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. आपल्या मनोगतात त्यांनी वृक्षांचे पर्यावरणीय, सामाजिक व आरोग्यदृष्ट्या असलेले महत्त्व अधोरेखित केले. प्रत्येकाने किमान एक वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प करावा, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि वनस्पतीशास्त्र विभागाने केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. विजय सुरोशी, प्रा. शुभांगी पवार तसेच वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख प्रा. रमेश झावरे यांनी विशेष परिश्रम घेतले.

या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव मतकर यांनी वृक्षांचे पर्यावरणीय, सामाजिक आणि आरोग्यविषयक महत्त्व अधोरेखित केले. वाढते प्रदूषण, हवामानातील बदल आणि पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी प्रत्येकाने किमान एक तरी वृक्ष लावून त्याचे संगोपन करावे, असे आवाहन त्यांनी केले. या उपक्रमात महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक आणि विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत कोनोकार्पस, नारळ अश्या विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. पर्यावरण संरक्षण आणि हरित परिसर निर्मितीसाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अनन्यसाधारण असल्याचे यावेळी उपस्थितांनी नमूद केले.

# बालदिंडीतून वारकरी संस्कृतीचा जागर मूकबधिर विद्यार्थ्यांना शाळेतच घडले पंढरीचे दर्शन

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी




**अहिल्यानगर-** वारकरी परंपरेचा आध्यात्मिक वारसा आणि महाराष्ट्राच्या समृद्ध संस्कृतीची ओळख मूकबधिर विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवता यावी या उद्देशाने सावेडी येथील अपंग संजीवनी सोसायटी संचलित मूकबधिर विद्यालय व वसतिगृह येथे आषाढी एकादशीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या बालदिंडी सोहळ्याने संपूर्ण विद्यालय परिसर विठ्ठलनामाच्या गजराने दुमदुमून गेला. टाळ-मृदुंगाच्या निनादात, अभंगांच्या सुरात भक्तिमय वातावरणात विद्यार्थ्यांनी शाळेतच पंढरपूर वारीचा अविस्मरणीय अनुभव घेतला.

कार्यक्रमाचे उद्घाटन संस्थेचे चेअरमन मधुकर भावले व संस्थेच्या संचालिका विद्या भावले यांच्या हस्ते करण्यात आले. बालदिंडीत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत विठ्ठल-रुक्मिणी मंदिराला प्रदक्षिणा घातली. त्यानंतर रिंगण, हरिपाठ आणि विठ्ठलनामाचा अखंड गजर यामुळे संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.

सोहळ्याचे प्रमुख आकर्षण ठरले ते दोन विद्यार्थ्यांनी साकारलेले विठ्ठल-रुक्मिणीचे जिवंत रूप. विटेवर उभ्या असलेल्या विठोबा-रुक्मिणीच्या वेशभूषेत विद्यार्थ्यांनी उपस्थितांना साक्षात पंढरपूरच्या दर्शनाची अनुभूती दिली. या भावस्पर्शी सादरीकरणाला उपस्थितांकडून उत्स्फूर्त दाद मिळाली.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांना पंढरपूरचे धार्मिक, ऐतिहासिक आणि सांस्कृतिक महत्त्व, वारकरी संप्रदायाची परंपरा तसेच श्री विठ्ठल भक्तीचे मूल्य याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. महाराष्ट्राची संतपरंपरा, सामाजिक ऐक्य आणि भक्तीचा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचा या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. विद्यालयाचे मुख्याध्यापक डी के जागधने यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. विठ्ठलनामाच्या अखंड गजरात आणि भक्तिमय वातावरणात कार्यक्रमाची सांगता झाली.

# विद्यार्थ्यांवरील लाठीहल्ल्याचा निषेधार्थ नगरमध्ये डाव्या पुरोगामी संघटनांचे वतीने निदर्शने

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर-** नवी दिल्लीतील जंतर-मंतर व संसद मार्चदरम्यान शांततापूर्ण आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या अमानुष पोलिस लाठीहल्ल्याचा अहिल्यानगरमधील पुरोगामी पक्ष आणि संघटनांच्या वतीने गुरुवारी तीव्र निषेध करण्यात आला.
नीट () पेपरफुटी प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई करावी आणि या संपूर्ण अपयशाची नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी तातडीने राजीनामा द्यावा, या प्रमुख मागण्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जोरदार निदर्शने करण्यात आली.
निदर्शनानंतर आंदोलकांच्या शिष्टमंडळाने मा. जिल्हाधिकाऱ्यांना मागण्यांचे निवेदन सादर केले.
शिक्षण व्यवस्थेतील भ्रष्टाचारावर कडाडून टीका यावेळी बोलताना आंदोलक नेत्यांनी केंद्र सरकारच्या दडपशाहीवर जोरदार हल्लाबोल केला. देशभरातील विद्यार्थी गेल्या महिन्याभरापासून आपल्या न्याय्य हक्कांसाठी आणि शिक्षण व्यवस्थेतील त्रुटींविरोधात शांततेच्या मार्गाने आंदोलन करत आहेत.

# १००० कोटींच्या कर्जाला ब्रेक! प्रशासन, सत्ताधारी झुकले, मनपाचा यू-टर्न; आता तीन संकुले बीओटीवर

**ठाकरे शिवसेनेच्या दबावामुळे सत्ताधाऱ्यांची माघार किरण काळेंचा दावा । पाणीपुरवठा योजनांच्या चौकशीकडे लक्ष, मुख्यमंत्र्यांकडे काळेंनी पाठवलेली तक्रार पुढील कारवाईसाठी आता नगरविकास खात्याकडे**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** मनपाच्या एक हजार कोटी रुपयांच्या कर्ज प्रस्तावाला ठाकरे शिवसेनेने केलेल्या तीव्र विरोधामुळे अखेर प्रशासन आणि सत्ताधाऱ्यांना माघार घ्यावी लागल्याचा दावा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे महानगरप्रमुख किरण काळे यांनी केला आहे. पाणी योजना, भुयारी गटारी साठीचा कर्जाचा प्रस्ताव देखील ठाकरे शिवसेनेच्या विरोधामुळे गुंडाळावा लागल्याचा दावा ही काळे यांनी केला आहे. संकुलन साठी कर्ज उभारणी करता बँकेकडून प्रस्ताव मागवणाऱ्या जाहिराती प्रसारित केल्या होत्या. त्यावरूनही ठाकरे शिवसेनेने राळ उठवली होती. पण आता हे सगळेच विषय विरोधामुळे बासनात गेले आहेत.

काल झालेल्या महासभेत प्रोफेसर चौक, सावेडी आणि गंज बाजार येथील तीन व्यापारी संकुले बीओटी तत्त्वावर उभारण्याचा निर्णय घेण्यात आला. तर नेहरू मार्केट आणि रंगभवन या दोन संकुलांबाबत अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार महापौरांना देण्यात आले. प्रशासन, सत्ताधारी हे ठाकरे शिवसेनेच्या विरोधामुळे झुकले. मनपाला यू-टर्न घ्यावा लागला. हा निर्णय म्हणजे ठाकरे शिवसेनेने उभारलेल्या जनदबावाचा विजय असल्याचा दावा काळे यांनी केला.

काळे यांनी सांगितले की, महापालिकेमध्ये ठाकरे शिवसेनेकडे संख्याबळ नसले तरी देखील सभागृहा बाहेरून हा दबाव आम्ही सत्ताधाऱ्यांवर निर्माण केला. त्यामुळेच सत्ताधाऱ्यांना देखील अखेर कर्जाला विरोध करण्याची उपरती झाली. मनपाची ढासळलेली आर्थिक स्थिती लक्षात घेता एवढे मोठे कर्ज शहरासाठी घातक ठरणार असल्याचे ठाकरे शिवसेनेने वारंवार स्पष्ट केले होते. याच अनुषंगाने वर्ल्ड बँकेला पत्र पाठवून मनपाची



आर्थिक स्थिती, संभाव्य आर्थिक धोके या बाबींचा कर्ज देताना गंभीरपणे विचार करण्याची मागणी काळे यांनी केली होती.

या आधीची महासभा ऐनवेळी लग्नसराईचे कारण पुढे करत रद्द करण्यात आली होती. मात्र, प्रत्यक्षात व्यापारी संकुलांमधील अर्थपूर्ण हितसंबंध, गाळे वाटपाच्या मलिद्याच्या मुद्द्यावर भाजप व राष्ट्रवादीच्या सत्ताधाऱ्यांमध्ये झालेले मतभेद ठाकरे शिवसेनेने चव्हाट्यावर आणल्यामुळे मागची महासभा रद्द करण्याची नामुष्की आली होती असा दावा काळे यांनी केला आहे. यापुढेही शहराच्या आर्थिक हिता विरोधातील कोणताही निर्णय, आर्थिक गैरव्यवहार किंवा जनतेवर कर्जाचा अन्यायकारक बोजा लादण्याचा प्रयत्न झाल्यास त्या विरोधात ठाकरे शिवसेना अधिक तीव्रतेने लढा उभारेल, असा इशारा किरण काळे यांनी दिला.

**पाणीपुरवठा योजनांच्या चौकशीकडे लक्ष**

पाणीपुरवठा योजना अथवा भुयारी गटार योजना यापैकी एका योजनेसाठी शेकडो कोटी रुपयांच्या कर्जाचा प्रस्ताव मनपा समोर होता. मागील रद्द झालेल्या महासभेत हे विषय चर्चिले जाणार होते. मात्र ठाकरे शिवसेनेच्या वतीने किरण काळे यांनी यापूर्वी राबवण्यात आलेल्या अमृत, फेज टू यासह सर्व योजनांची सखोल चौकशी, आर्थिक लेखा परीक्षण करण्याची मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे ३ जूनला केली आहे. मुख्यमंत्र्यांनी पुढील कारवाईसाठी नगर विकास खात्याचे अतिरिक्त मुख्य सचिव डॉ. गोविंदराज यांच्याकडे ती तक्रार ८ जून रोजी पाठवली आहे. आता याबाबत सरकारकडून चौकशी होणार काय याकडे शहराचे लक्ष लागले आहे.

**नेहरू मार्केटमध्ये अन्याय सहन करणार नाही**

दरम्यान, नेहरू मार्केटला कोणताही निधी उपलब्ध नसताना पालकमंत्र्यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले होते. त्यानंतर वराती मागून घोडे आणत वर्तमानपत्रातून कर्ज उभारणीसाठी मनपाने जाहिरात प्रसारित केली होती. आधीचे मार्केट पाडल्यामुळे विस्थापित झालेल्या मूळ लोकांना नवीन संकुलामध्ये बेसमेंटला गाळे देण्याच्या मागणीसाठी संजय झिंजे यांच्या नेतृत्वाखाली गेल्या अनेक वर्षांपासून लढा सुरू आहे. बाधितांची मागणी मनपाला पूर्ण करावी लागेल. ती न केल्यास ठाकरे शिवसेना या मुद्द्यावर वेळप्रसंगी कायदेशीर लढाई लढेल असा इशारा किरण काळे यांनी दिला आहे.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेतील १६.९६ लाख पात्र शेतकऱ्यांची यादी जाहीर

**शेतकऱ्यांनी ॲग्रीस्टॅकवर नोंदणी आणि आधार प्रामाणित करण्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांचे आवाहन**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** राज्य शासनाच्या महत्वाकांक्षी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६' अंतर्गत १६ लाख ९६ हजार पात्र शेतकऱ्यांची यादी जाहीर करण्यात आली असून उर्वरित पात्र शेतकऱ्यांच्या याद्याही लवकरच प्रसिद्ध करण्यात येणार असल्याची माहिती सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी दिली. या योजनेअंतर्गत राज्यातील सुमारे ५६ लाख पात्र शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचा लाभ मिळणार आहे. पात्र शेतकऱ्यांनी लाभ मिळविण्यासाठी ॲग्रीस्टॅकवर नोंदणी करून आधार प्रमाणीकरण प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी, असे आवाहन सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी केले.

योजनेतील पात्र लाभार्थ्यांची यादी संबंधित बँकांनी महाआयटीने विकसित केलेल्या पोर्टलवर अपलोड केली असून त्याची पडताळणी पूर्ण झाली आहे. आधार प्रमाणीकरणासाठी पात्र शेतकऱ्यांच्या नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर एसएमएसद्वारे सूचना पाठविण्यात येणार आहेत. तसेच ग्रामपंचायत कार्यालये, विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था आणि संबंधित बँक शाखांमध्येही लाभार्थ्यांच्या याद्या प्रसिद्ध केल्या जाणार आहेत. योजनेतील प्रत्येक पात्र लाभार्थ्याला एक विशिष्ट ओळख क्रमांक देण्यात येणार आहे. आधार क्रमांक किंवा या विशिष्ट क्रमांकाच्या आधारे आधार प्रमाणीकरण





करणे आवश्यक राहणार असून, राज्यातील सुमारे ३२ हजार 'आपले सरकार सेवा केंद्रांमार्फत ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

ॲग्रीस्टॅकवरील नोंदणी आणि आधार प्रमाणीकरण पूर्ण झाल्यानंतर पात्र लाभार्थ्यांच्या कर्ज खात्यात डीबीटी प्रणालीद्वारे कर्जमुक्तीची रक्कम जमा करण्यात येणार आहे. ही योजना केवळ कर्जमुक्ती पुरती मर्यादित नसून शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करून नव्या उमेदीने शेतीसाठी बळ देणारी योजना असल्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी सांगितले.

# समर्थ प्रशालेच्या प्रांगणात भक्तिमय वातावरणात रंगला बालदिंडी सोहळा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** समर्थ विद्या प्रसारक मंडळ संचलित श्री समर्थ विद्या मंदिर प्रशाला (प्राथमिक विभाग) यांच्या प्रांगणात आषाढी एकादशीनिमित्त बालदिंडी सोहळा उत्साहात व भक्तिमय वातावरणात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात प्रशालेच्या मुख्याध्यापिका सौ. गुंफेकर यांनी वारकरी संप्रदायाची महान परंपरा, संतांची शिकवण आणि बालदिंडीमागील संस्कारमूल्ये यांचे महत्त्व विशद केले. विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, भक्ती, एकोपा आणि संस्कृतीची जपणूक व्हावी, या उद्देशाने बालदिंडीचे आयोजन करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.



वारकरी वेशभूषेतील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी टाळ-मृदंग, भगव्या पताका आणि विठ्ठल नामाच्या गजरात बालदिंडी काढत संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. त्यानंतर सामूहिक विठ्ठल आरती झाल्याने वातावरण अधिकच भक्तिमय झाले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समर्थ विद्या प्रसारक मंडळाचे सेक्रेटरी तथा श्री समर्थ विद्या मंदिर प्रशालेचे शालेय समितीचे चेअरमन मा. श्री. सुरेश क्षीरसागर होते. आपल्या अध्यक्षीय मनोगतात त्यांनी संतपरंपरेतील संस्कार मुलांपर्यंत पोहोचविण्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले आणि पालकांनीही मुलांसोबत संस्कारमय परंपरा जपण्याचे आवाहन केले.

आषाढी एकादशीनिमित्त आयुर्वेद कॉलेजमध्ये विठुरायाची महाआरती उत्साहात

# धार्मिक विचार हाच संस्कारांचा पाया – आमदार संग्राम जगताप

**जगताप कुटुंबाची ६५ वर्षांची पायी दिंडी परंपरा आजही अखंड; धार्मिक सोहळ्याने आयुर्वेद कॉलेज परिसरात अवतरली पंढरी**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त आयुर्वेद कॉलेज येथे आमदार संग्राम जगताप यांच्या वतीने श्री विठ्ठल-रुक्मिणीची मनोभावे महापूजा, महाआरती व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. टाळ-मृदुंगाच्या गजरात, विठ्ठल नामाच्या अखंड गजरात आणि भक्तिमय वातावरणात पार पडलेल्या या सोहळ्यामुळे आयुर्वेद कॉलेज परिसरात अक्षरशः पंढरी अवतरल्याचे चित्र निर्माण झाले. विठुरायाच्या दर्शनासाठी व महाआरतीसाठी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहत भक्तिभावाने सहभाग नोंदविला.

आषाढी एकादशीनिमित्त आयुर्वेद कॉलेज येथे आयोजित या धार्मिक सोहळ्यास माजी महापौर बाबासाहेब वाकळे, माजी उपमहापौर गणेश भोसले, प्रा. माणिकराव विधाते, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, माजी सभापती कुमारसिंह वाकळे, अमोल गाडे, नगरसेवक मनोज कोतकर, माजी नगरसेवक दगडू मामा पवार, ज्ञानेश्वर रासकर, संभाजी पवार, विशाल पवार, नगरसेवक प्रकाश भागानगरे, माजी उपमहापौर अनिल बोरुडे, ॲड. युवराज शिंदे, नगरसेवक निखिल वारे, सनी सूर्यवंशी, महेश लोंढे, जालिंदर कोतकर, अनिल मुरकुटे, डॉ. विजयकुमार भंडारी, ऋग्वेद गंधे, प्रा. अरविंद शिंदे, नगरसेविका शितल ढोणे, अजय ढोणे, सुशांत म्हस्के,



अवधूत कुलसौंदर, बाबुशेठ नागरगोजे, महादेव कराळे, महेंद्र कांबळे, संतोष ढाकणे, सागर गुंजाळ, ज्ञानदेव पांडुळे, विजय गव्हाळे, योगेश ढुबे, मनीष फुलडाळे, अभिजित बोरुडे, महेश तवले, गोरख पडोळे, शिवाजी चव्हाण, उद्योजक राजेश भंडारी, दत्ता गाडळकर, सुमित लोंढे यांच्यासह हजारो भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी आमदार संग्राम जगताप म्हणाले की, महाराष्ट्राच्या संतभूमीने संपूर्ण भारताला अध्यात्म, भक्ती आणि संस्कारांची दिशा दिली आहे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव यांसारख्या संतांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या या भूमीत आषाढी एकादशीला लाखो वारकरी पंढरपूर येथे श्री विठ्ठलाच्या दर्शनासाठी पायी जातात. आषाढी एकादशी हा केवळ धार्मिक उत्सव नसून श्रद्धा, समता, भक्ती आणि संस्कारांचा महापर्व आहे. या दिवशी प्रत्येक भक्त मनोभावे पांडुरंगाची पूजा करून जीवनाला नवी ऊर्जा प्राप्त करतो.

ते पुढे म्हणाले की, जगताप कुटुंबीय गेल्या तब्बल ६५ वर्षांपासून वारकरी पायी दिंडी पालखी सोहळ्याची अखंड परंपरा जपत आहेत. आमचे आजोबा कै. बलभीम जगताप यांनी सुरू केलेला हा धार्मिक वारसा आमचे वडील कै अरुण काका जगताप आणि आता आम्ही पुढे नेत आहोत. प्रत्येकाने आपल्या धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरा जपल्या पाहिजेत. धर्माचा विचार हाच संस्कारांचा मुख्य पाया असून समाजामध्ये चांगले संस्कार रुजविण्यासाठी धार्मिक परंपरांचे जतन होणे अत्यंत आवश्यक आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी संत-महंतांचे विचार आत्मसात करून हिंदवी स्वराज्य उभारले. त्याच आदर्शावर चालत समाजात , संस्कार आणि अध्यात्म जपणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले.

यावेळी श्री विठ्ठल-रुक्मिणीची महापूजा व महाआरती भक्तिमय वातावरणात संपन्न झाली. टाळ, मृदुंग, वीणा आणि हरिनामाच्या गजरात संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. धार्मिक कार्यक्रमानंतर उपस्थित सर्व भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. श्रद्धा, भक्ती आणि सामाजिक एकात्मतेचा संदेश देणारा हा सोहळा उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाला.

# संत भगवानबाबा उच्च महाविद्यालयात भक्तिमय पालखी सोहळा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**खरवंडी कासार–** आषाढी एकादशीनिमित्त संत भगवान बाबा कला व विज्ञान उच्च माध्यमिक विद्यालयात वारकऱ्यांची भक्तीची आणि उत्साहाची असलेली पंढरीची वारी निमित्त पारंपारिक पालखी सोहळ्याचे उत्साहात आयोजन करण्यात आले होते. या पालखी सोहळ्यामध्ये पंढरीच्या विठुरायप्रती असलेली श्रद्धा आणि संत भगवानबाबा यांनी घालून दिलेली विचारसरणी यांचा अनोखा संगम पाहायला मिळाला त्याचबरोबर विद्यार्थ्यांना अध्यात्म संस्कार, सामाजिक मूल्याची रुजवण व्हावी या उद्देशाने भगवानबाबा ग्रामविकास संस्थेचे अध्यक्ष श्री संजय बडे आणि सचिव श्री दत्ताभाऊ बडे यांच्या प्रेरणेने व संकल्पनेने या दिमाखदार सोहळ्याच्या आयोजन करण्यात आले होते.या आकर्षक कार्यक्रमाची सुरुवात श्री विठुराया आणि रुक्मिणीमाता यांच्या पूजनाने झाली.



(छाया- सतिष जगताप )

महाविद्यालयातील तसेच कै.त्रिंबकराव बडे इंग्लिश मिडीयम स्कूल मधील सर्व विद्यार्थ्यांनी या पालखी सोहळ्यात आनंदाने सह भाग घेतला. हा पालखी सोहळा खरवंडी गावामध्ये भव्य वारकरी वेशभूषेत, भगव्या पताका, टाळ मृदुंग, लेझीम आणि ढोल ताशा यांच्या निनादात पालखी सोहळा हरिनामाच्या गजरात काढण्यात आला.

या पालखी सोहळ्याने संपूर्ण परिसर वारकरी संप्रदायाच्या भक्तीरसाने भरून गेला आणि विठुरायाच्या भक्तिरसात न्हाऊन निघाला.यामध्ये विद्यार्थ्यांच्या कपाळावरील गोपीचंद टिळा गळ्यात तुळशीच्या माळा हातात भगव्या पताका हा या पालखी सोहळ्याचा आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला. विद्यालयातील विद्यार्थिनीने डोक्यावर तुळशी वृंदावन घेऊन पालखी सोहळा संपन्न केला. या मध्ये वारकरी संप्रदायामध्ये महत्वाचे असलेले आणि पूर्वीपासून चालत आलेले रिंगण याचेही दिमाखदार आयोजन करण्यात आले तसेच भगवान बाबांनी शिकवण दिलेल्या घोषवाक्याचे फलकही दर्शविण्यात आल्याने पालखीचे स्वरूप अधिक आकर्षक बनल्याचे दिसले या पालखी सोहळ्याचे परिसरातून कौतुक करण्यात आले.

या संपूर्ण सोहळ्याचे नियोजन संत भगवानबाबा महाविद्यालय च्या उपाध्यक्ष सौ. अनामिका कराड मॅडम यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले होते.

या दिमाखदार सोहळ्याचे महाविद्यालयाचे प्राचार्य सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी तसेच इंग्लिश स्कूल चे मुख्याध्यापक आणि शिक्षक यांनी हा पालखी सोहळा पार पाडण्यासाठी नियोजन केले.

# मराठी राजभाषा संवर्धन कृती समितीच्या अहिल्यानगर पुर्व जिल्हाकार्याध्यक्षपदी रामेश्वर वडघणे यांची निवड!

(छाया : बाबा पालवे)



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**शेवगाव–** महाराष्ट्राची मायबोली मराठी भाषा प्रत्येक घराघरात पोहोचावी, तिचा प्रचार-प्रसार आणि संवर्धन अधिक प्रभावीपणे व्हावे तसेच मराठी भाषेविषयी समाजामध्ये विद्यार्थ्यांमध्ये अभिमान व जनजागृती निर्माण व्हावी, या उद्देशाने कार्यरत असलेल्या मराठी राजभाषा संवर्धन प्रतिष्ठानच्या वतीने राज्यभर संघटनात्मक बांधणीला गती देण्यात आली असून, त्याअंतर्गत राज्य, जिल्हा आणि तालुका कृती समित्यांची स्थापना करण्यात येत आहे.

राज्य कृती समिती आणि जिल्हा कृती समितीच्या मार्गदर्शनाखाली नुकतीच शेवगाव ,पाथर्डी तालुका कृती समिती गठित करण्यात येत आहे. त्यामध्ये शिक्षण, सामाजिक कार्य आणि मराठी भाषा संवर्धनासाठी उल्लेखनीय योगदान देणाऱ्या मान्यवरांची विविध पदांवर सर्वानुमते निवड करण्यात येत आहे. यामध्ये श्री.भगवान माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, बालमटाकळी येथील कर्तव्यदक्ष, विद्यार्थीप्रिय, स्पर्धाप्रिय व आदर्श शिक्षक श्री. रामेश्वर वडघणे यांची अहिल्यानगर पूर्व ''जिल्हाकार्याध्यक्ष'' म्हणून सर्वानुमते निवड करण्यात आली. यावेळी प्रतिष्ठानच्या राज्याध्यक्षा सौ. सुलोचना क्षीरसागर मॅडम यांनी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र प्रदान करून त्यांचे अभिनंदन केले. मराठी भाषा ही महाराष्ट्राच्या संस्कृतीची, अस्मितेची आणि ओळखीची जपणूक करणारी भाषा असून ही आपली ज्ञानभाषा होण्यासाठी प्रयत्न करणार आहोत असे मत नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केले!

यावेळी मराठी संवर्धनचे संस्थापक श्री. अमोल क्षीरसागर सर शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते! ❋संस्थेचे सन्माननीय अध्यक्ष मा.श्री श्रीप्रकाशजी बोरा साहेब,प्राचार्य श्री. गागरे सर , पर्यवेक्षक श्री आंधळे सर ज्येष्ठ शिक्षक श्री मापारे सर,श्री. जवरे सर श्री काटे सर श्री .तोतरे सर श्री. मुळे सर श्री. मुरूमकर सर श्री जोशी सर श्री शिंदे सर श्री. ढाकणे सर श्री कुलत सर सौ. नजन मॅडम, देशमुख मॅडम,पवार मॅडम, मापारे मॅडम श्री साबळे सर यांनी वडगणे सरांचे अभिनंदन केले

(पान १ वरून)

## राजस्थानमधून नगरमध्ये मेफेड्रोन विक्रीसाठी आलेला आरोपी अटकेत

झडती घेतली असता ५ लाख ८३ लाखांचे २९ ग्रॅम एमडी ड्रग्स, साडेपाच लाखांची विनानंबरची स्विफ्ट कार आणि १० हजारांचा मोबाईल असा मुद्देमाल आढळून आला. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात एनडीपीएस कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे व उपविभागीय अधिकारी शिरीष वमने यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि हेमंत थोरात, पोसई मनोज मोंढे, संदीप पवार, किशोर जाधव, सचिन हरदास, अक्षय रोहोकले, सूरज देशमुख आणि उमेश शेरकर यांच्या पथकाने केली.

## केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा

अपेक्षांचा मनापासून आदर करतो. भारतातील तरुण पिढीची स्वप्ने साकार करणे हा आपल्या सर्वांच्या राजकीय आणि सामाजिक जीवनाचा नैतिक संकल्प राहिला आहे. आदरणीय पंतप्रधानांच्या दूरदृष्टी नेतृत्वाखाली राष्ट्रसेवा करण्याची जी संधी मला मिळाली, त्याबद्दल मी मा. पंतप्रधानांचे आभार व्यक्त करतो. नीटमधील गोंधळाची पहिल्या दिवसापासूनच मी जबाबदारी घेतली आणि या परिस्थितीपासून कधीही तोंड लपवले नाही. परीक्षा माफियामुळे आपण कोणत्याही गुणवंत विद्यार्थ्याची शक्यता खराब होऊ देणार नाही, कोणत्याही विद्यार्थ्यावर अन्याय होऊ देणार नाही, हा माझा संकल्प होता. परंतु या कालावधीतही अनेक विद्यार्थ्यांना दिशाभूल करण्यासाठी जबाबदार पदांवर बसलेल्या व्यक्तींनी अडथळे आणण्याचा प्रयत्न केला, ज्यामुळे मन अत्यंत व्यथित झाले. गेल्या १० दिवसांचा घटनाक्रम पाहून माझे मन दुःखी आहे. हा माझ्यासाठी वैयक्तिक प्रतिष्ठेचा विषय नाही. भारताची युवाशक्तीच या देशाची खरी ताकद आहे. देशाच्या युवाशक्तीला भ्रमाच्या चक्रव्यूहात फसू देणार नाही, हाच माझा संकल्प आहे, असे प्रधान यांनी म्हटले आहे. राष्ट्रविरोधी शक्तींनी फायदा घेऊ नय याचा विचार करून घेतला निर्णय जंतर-मंतरवर आणि देशात जी परिस्थिती निर्माण झाली आहे, त्या परिस्थितीचा राष्ट्रविरोधी शक्तींनी फायदा घेऊ नये, देशाची एकता कायम राहावी, भारतातील एकाही विद्यार्थ्याचे भविष्य कायदेशीर अडचणींत अडकू नये, आपल्या मुलांनी त्यांचा वेळ अभ्यासात घालवावा आणि करिअर घडवण्यावर भर द्यावा, याच गोष्टीचा विचार करून मी माझा राजीनामा आदरणीय पंतप्रधानांकडे पाठवला आहे.

## नेवाशात शेतात लपवलेल्या गांजासह दोघे रंगेहाथ जेरबंद

महादेव पंडित जवदे (वय ३८ वर्षे) आणि त्याचा साथीदार शुभम बाबासाहेब काळे (वय २९ वर्षे, दोघे रा.वाकडी,ता. नेवासा) यांना ताब्यात घेतले. या प्रकरणी पोलीस अंमलदार शहाजी बाबासाहेब आंधळे यांच्या फिर्यादीवरून नेवासा पोलीस ठाण्यात एनडीपीएसप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कारवाईत यांचा सहभाग

ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन,अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे, उपविभागीय पोलीस अधिकारी निरज राजगुरू,पोलीस निरीक्षक प्रताप दराडे ,सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल पवार ,पोसई मनोज अहिरे ,पोलीस हवालदार शहाजी आंधळे ,रवी शेळके ,अजय साठे, पोलीस कॉन्स्टेबल अमोल डमाळे, हरी गायतडक ,संदीप ढाकणे, सुमित करंजकर,नवनाथ शेकडे, गणेश फाटक, राहुल गायकवाड, चालक पोलीस हवालदार खंडागळे मेजर, महिला पोलीस कॉन्स्टेबल वर्षा कांबळे व होमगार्ड यांनी केली.

## रुग्णांच्या आजारांचे वेळेवर निदान होणे अत्यंत महत्त्वाचे – आमदार संग्राम जगताप

मिळणार असून रुग्णांना अधिक दर्जेदार सेवा उपलब्ध होईल.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित मान्यवरांनी स्वर्गीय शिवलालजी व गोकुळजी गांधी यांच्या सेवाभावी कार्याचा गौरव करत गांधी परिवाराच्या सामाजिक उपक्रमांचे कौतुक केले. अत्याधुनिक वैद्यकीय सुविधांमुळे सर्वसामान्य रुग्णांना मोठा दिलासा मिळणार असून समाजोपयोगी आरोग्यसेवेची परंपरा अधिक सक्षमपणे पुढे सुरू राहील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.